# 2 थेस्सलनीकाकरांस

2 Thessalonians

# 2 थेस्सलनीकाकरांस

*पौलाचे थेस्सलेनीकाकरांस दुसरे पत्र*

## 1

1 पौल व सिल्वान आणि तीमथ्याकडून थेस्सलनीकाच्या चर्चच्या नांवे, त्या सर्वांना जे पित्या परमेश्वराच्या व आपल्या
प्रभू येशूंच्याठायी आहेत.
2 आपला पिता परमेश्वर व प्रभू येशूंतर्फे अनुग्रह व शांति तुम्हांस मिळो.
3 हे भाऊबहिणीनों, तुमच्याविषयी आम्ही हरेक समयी, परमेश्वराची महिमा व स्तुति करावयास हवीच, कारण हे
अगदी न्याय्य (उचित) देखील आहेच, त्याचे कारण हेच आहे की तुमचा विश्वास प्रचंड भक्कम होतो आहे व आपसांतील
प्रेमही विपुल होत जाते आहे. 4 अर्थात एवढे विशाल की आम्ही स्वतः परमेश्वराच्या चर्चमध्ये तुमच्यासंबंधी आनंदित
होतो आहोत, यासाठीच की जेवढा छळ (संकटें) तुम्ही सहन करीत आहा, त्या सर्वांत तुमचा धीर (संयम) व विश्वास
दिसतोच आहे.
5 परमेश्वर-प्रभूच्या सच्च्या (खऱ्या) न्यायाचे, हे ठोस सबळ प्रमाण आहे की तुम्ही निःशक असे, परमेश्वरी राज्याच्या
पात्रतेचे ठरावे, ज्यासाठी तुम्ही दुःख सहन देखील करीत आहा. 6 कारण परमेश्वराकडे असा न्याय आहे, की जे तुम्हांस
दुःख देतात, त्यांना मोबदल्यात (परतफेड) त्याने दुःख द्यावे, व जे तुम्ही, क्लेश व संकटे भोगिता त्या तुम्हांस
आमच्याबरोबर चैन-विश्राम द्यावा. 7 आता जे तुम्ही छळ मार्गावरून (सहन) जाता आहा, त्या तुम्हांस, परमेश्वर
आमच्यासह सांत्वन देखील देईल. त्या समयी जेव्हा प्रभू येशू त्यांच्या सामर्थी दूतांसह, धगधगणाऱ्या अग्निमध्ये
स्वर्गातून येतील. 8 तेव्हा परमेश्वरास न ओळखणाऱ्यांना व आपल्या प्रभू येशूंच्या सुवार्तेवर विश्वास (न मानणारे) न
ठेवणाऱ्यांना तो दंड देईल. 9 असे लोक प्रभू समोरून व त्याच्या सामर्थ्याच्या तेजापासून दूर होऊन अनंत-विनाशाचा दंड
प्राप्त करतील. 10 हे त्या दिवशी होईल (घडेल) जेव्हा येशू आपल्या पवित्र लोकांचा महिमा प्राप्त करावा म्हणून, सर्व
विश्वास करणाऱ्या लोकांच्याठायी आश्चर्याचे व प्रशंसा-स्तुतिचे कारण होण्यासाठी येतील, कारण तुम्ही सर्वांनी
आमच्याच साक्षीवर विश्वास (भरंवसा) ठेविला आहे.
11 यासाठीच तर आम्ही सदैव (निरंतर) तुम्हां सर्वांसाठी प्रार्थना सुद्धा करीत असतो, जेणेकरून आपल्या परमेश्वराने
तुम्हांला या पाचारणायोग्य (बोलाविले जाणे) समजावे व भलेपणाची कृत्यें, हरेक अभिलाषा (इच्छा) व विश्वासाचे
प्रत्येक कृत्य, सामर्थ्यासह (निशी) पूर्ण करावे. 12 जेणेकरून आपला परमेश्वर व प्रभू येशू ख्रिस्त यांची जी कृपा आहे,
त्यान्वये, आपल्या प्रभू येशूंचे नांव, तुमच्यामध्ये महिमामय व गौरवान्वित व्हावे व तुम्ही सर्वांनी त्यांच्यात.

## 2

1 अहो बंधूभगिनीनों, आम्ही आपल्या प्रभू येशूंच्या येण्याविषयी व त्यांच्याजवळ आपले एकत्र होणे याविषयी तुम्हांला
विनंती करीत आहोत, 2 ती अशी की कोणताही आत्मा वा संदेश वा असे पत्र, जणू ते आमच्याकडूनच आले आहे, असे
मानून व प्रभू येशूंचा दिवस येऊन ठेपलाच आहे, अशा जाणीवेने तुमची मनें अचानक अस्थिर होता कामा नये आाणि
तुम्ही घाबरून जाता कामा नये. 3 कशा प्रकारेही, कोेणाच्याही धोक्यात फसू नका, कारण तो दिवस तोवर येणे नाहीये,
जोवर विश्वासाचा त्याग होत नाही व अपराधांचा तो पुरुष अर्थात विनाश-पुत्राचे आगमन होऊन तो प्रगट होत (दृष्टिस
पडत) नाही. 4 अर्थात जो विरोध करितो व ज्या परमेश्वराची आराधना केली जाती आहे, त्याहून स्वतःला अतिश्रेष्ठ महान
ठरवितो, म्हणजे स्वतःस इतका उंच करितोे की परमेश्वराच्या भवनात बसून आपल्या स्वतःस ‘मीच परमेश्वर आहे
असे प्रगट करितो.

5 तुम्हांला आठवीत नाहीये काय, की ज्या समयी मी तुमच्याबरोबर होतो, त्या समयी तुम्हांला याच सर्व गोष्टी सांगीत
असे? 6 आणि आता तर तुम्हांला नीटशी जाणीव आहे की कोणती गोष्ट त्याला प्रतिबंध घालीत आहे जेणेकरुन त्याने
त्याच्या नेमक्या नियुक्त समयीच प्रगट व्हावे. 7 कारण अनाचाराचे (अधर्म/अनीती) रहस्य आताही चालू आहे, पण
आता एक थांबविणारा (अडविणे) आहे, व जोवर तो दूर केला जात (काढला) नाही, तो प्रतिबंध करीत राहणार.
8 त्यानंतर, तो दुष्ट प्रगट होईल, ज्याला प्रभू येशू आपल्या मुखाच्या फुंकरीने ठार करतील व आपल्या आगमनाच्या
तेजाने भस्म करतील. 9 त्या अनीतिमानाचे आगमन सैतानाच्या कार्यांनुसार (सैतानीकार्ये) सर्व प्रकारची खोटी शक्ति-
चिन्ह व अद्‌भुत कृत्यांसह, 10 व नष्ट होण्यांसाठी दुष्टाईच्या सर्व तऱ्हेच्या धोक्यांसह (कपट-ठकबाजी) असणार. कारण
या सर्व लोकांनी सच्चेपणावर प्रेम (आवड) केले नाही, होय, तेच सत्य ज्यामुळे त्यांचा उद्धार झाला (शक्य) असता. 11 व
याच कारणामुळे, परमेश्वर त्यांच्यामध्ये एक भटकविणारी ताकद पाठवेल, जेणेकरून त्यांनी जे खोटे व चुकीचे तेच
स्वीकारावे. 12 आणि जे-जे लोक सत्यावर भरंवसा ठेवीत नाहीत पण त्या विपरित, दुष्टाईमुळे आनंदी होत असतात अशा
सर्वांना दंड मिळावा.

13 हे भाऊबहिणीनों, आणि प्रभूचे प्रिय लोकहो, आम्ही तुमच्याविषयी निरंतर परमेश्वराचे आभार मानत रहाणे न्याय्यच
(योग्य) आहे, की परमेश्वराने सुरवातीपासूनच तुम्हांला यासाठी निवडिले, की आत्म्याद्वारे पवित्र होऊन व सच्चेपणावर
विश्वास ठेवून तुम्ही मुक्ति मिळवून घ्यावी. 14 त्यासाठी त्याने (वाचविले) तुम्हांला, आमच्या येशू-वार्तेद्वारे बोलावून
(वाचविले) घेतले, जेणेकरून तुम्ही सर्वांनी आपल्या येशूंचा महिमा मिळवून घ्यावा. 15 म्हणून हे बंधूभगिनीनों अटळ
रहा व ज्या-ज्या गोष्टी (महत्वाच्या बाबी) आमच्याद्वारे, वचनांमधून असो किंवा पत्रांद्वारे तुम्ही शिकला आहा त्या
मजबूतीने धरून रहा.

16 आपले प्रभू येशू स्वतःच व आपला परमेश्वर-बाप ज्याने आपल्यावर प्रेम केले व कृपेने अनंत शांति व उत्तम आशा
दिली आहे, 17 त्याने तुमच्या मनांत शांति द्यावी व तुम्हांला हरेक उत्तम कार्य व वागण्या-बोलण्यात प्रोत्साहन देऊन
शहाणे करावे.

# 3

1 आता शेवटी, अहो बधूंभगिनींनो, आमच्यासाठी प्रार्थना करीत जा, यासाठी की प्रभूचे वचन असे जलद गतिने पसरो
व महिमा प्राप्त करो, जसे तुमच्याबाबतीत (तुमच्यात) झाले होते. 2 आणि आम्ही हुज्जतखोर-वाकडया (हट्टी)
मनुष्यांपासून राखिले जावोत, कारण हरेकात (प्रत्येकामध्ये) विश्वास नसतो. 3 परंतु, प्रभू सच्चा (सच्चा) आहे, तो तुम्हांस
अस्थिर होऊ देणार (डळमळीत नसलेले) नाही, व तुम्हांला त्या दुष्टांपासूनही (लोक) राखून (सुरक्षित) ठेवील.
4 आम्हांला प्रभूमध्ये तुमच्यावर भरंवसा आहे, की जो-जो आदेश आम्ही तुम्हांला देत असतो त्यांचे तुम्ही पालनही
(मानणे) करिता व पुढे आमचे आदेश देखील मानत रहाल. 5 परमेश्वराचे प्रेम व येशूंच्या धीरासह वाट (प्रतिक्षा)
पाहाण्याच्या दिशेने, प्रभू तुमच्या मनांचे मार्गदर्शन करीत राहो.

6 हे भाऊबहिणींनो आम्ही तुम्हांला आपल्या प्रभू येशूंच्या नांवाने अशी आज्ञा देत आहोत. की प्रत्येक अशा भावांपासून
वेगळे (दूर) रहा, ज्याची चालचलणूक व्यवस्थित (योग्य) नाहीये व जी शिकवण त्याने आमच्यापासून घेतली आहे,
त्यानुसार करीत नाहीये. 7 तुम्ही स्वतःच नीटशी जाणीव बाळगता की तुमचे जीवन आमच्या जीवनाप्रमाणे असावयास
हवे होते; ते ठाऊक असणे अगत्याचेही होते, कारण आम्ही तुमच्यामध्ये अयोग्य (अव्यवस्थित) जीवन जगत नव्हतोच
मुळी, 8 कोणाचीही भाकर, आम्ही फुकटात खाल्ली नव्हती परंतु, श्रम व कष्ट करून रात्रंदिवस आम्ही तुमच्यापैकी
कोणावरही ओझे होऊ नये म्हणून,काम- धंदा - व्यवसाय करीत होतो. 9 असे नव्हते की आम्हांस तसा अधिकार नव्हता
परंतु केवळ यासाठीच की तुमच्यासमोर आम्ही स्वतःस एक आदर्श म्हणून सादर करावे, जेणेकरून तुम्ही देखील
आमच्याप्रमाणेच जगावे (वर्तन करावे). 10 ज्या वेळी आम्ही तुमच्यामध्ये होतो, त्या वेळी देखील हीच आज्ञा तुम्हांला
देत होतो, की जे लोक परिश्रम करू इच्छित नाहीत, त्यांना अन्न (भाकर खाणे) सेवनाचाही हक्क नाहीये.

11 आम्ही ऐकीत आहोत (कानांवर आले) की तुमच्यातील काही लोकांचे वर्तन आक्षेपार्ह आहे, त्यांची वागणूक नीट
नाहीये, निष्क्रिय व बिनकामाचे असे ते बसून राहतात परंतु, दुसऱ्यांच्या कामात ढवळाढवळ (हात घालणे) करीत
असतात. 12 अशा नालायकांना आम्ही प्रभू येशूंच्या नांवाने आज्ञा देतो, की चुपचाप (शब्दही न काढता) काम (श्रम) करा
व आपलीच (मिळविलेली) भाकर खा. 13 हे भावांनोबहिणीनों भलेपणाची कृत्यें (हितकार्य) करण्यात उणे पडू नका,
पीछेहाट (मागे राहणे) करू नका.
14 असा कोणी दृष्टीस पडेल, जो आमच्या या पत्रातील गोष्टींचे पालन करीत (मानीत) नसेल, तर त्याच्यावर लक्ष ठेवा,
अशा मनुष्याची संगत करू नका (बरोबर राहू नका), त्याला लाज वाटावी म्हणून असे वागा. 15 तरीही, त्याला शत्रु
समजू नका, पण भाऊ समजून चेतावनी द्या, त्याला नीट बजावून सांगा.
16 आता प्रभू, जो शांतीचा झरा आहे, स्वतःच तुम्हांला सदैव सर्व प्रकारे शांती देवो. प्रभू तुम्हां सर्वांसह असो.
17 मी पौल माझ्या हाताने, आशीर्वादाचे शब्द लिहीतो आहे, प्रत्येक पत्रात माझे हेच प्रमाण (चिन्ह) आहे की मी अशा
रीतिनेच लिहीत असतो.
18 आपल्या प्रभू येशू ख्रिस्तांची असीम कृपा तुम्हां सर्वांवर होत राहो.